


दैनिक

# आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com


"गुरु म्हणजे
केवळ ज्ञान देणारी व्यक्ती नव्हे,
तर योग्य संस्कार, जीवनमूल्ये
आणि यशाचा मार्ग
दाखवणारा दीपस्तंभ."

गुरुपौर्णिमेच्या मनःपूर्वक शुभेच्छा!


• वर्ष : ०३ • अंक : ३०७ • पुणे • बुधवार, दि. २९ जुलै २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313


## ठळक बातम्या

### भटक्या श्वानांची संख्या येणार समोर

पुणे (आरंभ पर्व) : पुणे शहरासह महापालिकेच्या हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांमधील भटक्या श्वानांची एकूण संख्या लवकरच समोर येणार आहे. भटक्या श्वानांची संख्या निश्चित करण्यासाठी महापालिकेने प्रक्रिया सुरू केली आहे. त्यामुळे पुणे शहरातील जुन्या हद्दीसह पहिल्यांदाच महापालिकेत समाविष्ट झालेल्या ३२ गावांमधील श्वानांची संख्याही निश्चित होणार आहे. ही श्वानांची गणना पूर्ण होण्यासाठी एका वर्षाचा कालावधी लागणार आहे. शहरातील भटक्या कुत्र्यांची गणना करण्यासाठी पुणे महापालिकेने सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार निविदा काढली आहे. यामध्ये पुणे शहराची जुनी हद्द आणि नवीन हद्दीतील सर्व भटक्या श्वानांची संख्या मोजली जाणार आहे. या कामासाठी सुमारे २५ लाख रुपयांचा खर्च अपेक्षित असून, ज्या खासगी संस्थेकडून हे काम केले जाणार आहे. त्यांना यासाठी ॲप विकसित करावे लागणार आहे. पुणे शहरातील प्रत्येक गल्ली, रस्ता, सोसायट्या यांसह सार्वजनिक जागांमधील भटक्या श्वानांची गणना केली जाणार आहे.

### पेठाही आल्या एफडीएच्या रडारावर

पुणे (आरंभ पर्व) : अन्नातील भेसळ, निकृष्ट दर्जा आणि अन्न सुरक्षा नियमांच्या उल्लंघनाविरोधात अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) पुणे विभागात मोठी कारवाई करून चार दिवसांत ४५ लाख ७० हजार १६८ रुपयांचा संशयित निकृष्ट, असुरक्षित आणि चुकीच्या लेबलिंगचा अन्नसाठा जप्त केला. पुणे, सातारा आणि सांगलीतील आठ आस्थापनांवर छापे टाकण्यात आले. याशिवाय, स्वच्छता व अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी पाच हॉटेलांचे परवाने निलंबित करण्यात आले. 'एफडीए'ने २४ ते २७ जुलैदरम्यान राबविलेल्या विशेष तपासणी मोहिमेत पुणे शहरातील गणेश पेठ व नाना पेठ परिसरातील घाऊक व्यापाऱ्यांवर विशेष लक्ष केंद्रित केले.

# मानाजीनगर ग्रीनलँड कंट्री सोसायटी चौकात वाहतूक पोलीस नियुक्त

## नागरिकांना दिलासा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मानाजीनगर, नऱ्हे येथील ग्रीनलँड कंट्री सोसायटीसमोरील चौकात वारंवार होत असलेल्या वाहतूक कोंडीमुळे नागरिक, शालेय विद्यार्थी तसेच नोकरदार वर्गाला मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत होता. या समस्येची गांभीर्याने दखल घेऊन 'आपल्या हक्काचा रस्ता संघर्ष समिती' व श्री. रोहिदास जोरी यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश मिळाले असून, संबंधित चौकात वाहतूक पोलीस नियुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यापूर्वी अपर पोलीस आयुक्त (पूर्व प्रादेशिक विभाग) यांनी वाहतूक विभागाला योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल गौड तसेच सहाय्यक पोलीस निरीक्षक शिंदे यांनी घटनास्थळी प्रत्यक्ष पाहणी करून स्थानिक नागरिकांच्या अडचणी जाणून घेतल्या. शाळकरी मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि नोकरदार वर्गाची गैरसोय लक्षात घेऊन या ठिकाणी वाहतूक पोलीस नियुक्त करण्याचे आश्वासन देण्यात आले असून, त्याची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. वाहतूक सुरळीत करण्यासाठी चौकात लोखंडी बॅरिगेट उभारण्यात येणार असून, नवले हॉस्पिटलसमोरील रस्ता जडवाहनांसाठी बंद ठेवण्यात येईल. तसेच दुचाकी वाहनांसाठी पर्यायी मार्ग उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. या पाहणीवेळी श्री. रोहिदास जोरी, 'सकाळ'चे पत्रकार निलेश चांदगुडे, भानुदास साठे, युवा उद्योजक स्वप्निल कुटे, नितीन खटावकर, प्रशांत पाटील, प्रवीण वाली, सूर्यकांत चव्हाण, नितीन घोलप तसेच परिसरातील अनेक नागरिक उपस्थित होते.



• रोजच्या ट्राफिकचे समस्या सांगताना जोरी साहेब आणि इतर मान्यवर •

स्थानिक नागरिकांनी सांगितले की, श्री. रोहिदास जोरी कोणत्याही पदावर नसतानाही केवळ जनहिताच्या भावनेतून परिसरातील विविध समस्यांवर सातत्याने काम करत असून, संबंधित शासकीय विभागांकडे प्रामाणिकपणे पाठपुरावा करतात. त्यांच्या कार्यामागे कोणताही श्रेयवाद नसून नागरिकांच्या हितालाच त्यांनी नेहमी प्राधान्य दिले आहे.

नागरिकांनी वाहतूक विभाग, पुणे पोलीस तसेच 'आपल्या हक्काचा रस्ता संघर्ष समिती'चे आभार मानत, या उपाययोजनांमुळे परिसरातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होईल, असा विश्वास व्यक्त केला.



## सायबर सुरक्षा तंत्रज्ञान शिक्षण ही काळाची गरज : डॉ पराग काळकर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आजच्या काळामध्ये माणसाचे जीवन हे पूर्णतः तंत्रज्ञानाने व्यापून टाकलेले आहे. माणूस कुठेही गेला तरी त्याच्यासोबत मोबाईल सारखे तंत्रज्ञान कायमस्वरूपी असते. त्यामुळे, माणसाची सर्व माहिती तंत्रज्ञानाकडे असते. गुन्ह्याचे स्वरूप बदलल्यामुळे तपास यंत्रणा आणि पद्धतही बदलणे गरजेचे असून सायबर सुरक्षा तंत्रज्ञानासंदर्भात माहिती आणि शिक्षण ही आता काळाची गरज बनली आहे, असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र- कुलगुरू प्रा. डॉ. पराग काळकर यांनी व्यक्त केले. ट्रान्सेडेंटल टेक्नॉलॉजीज, तंत्रज्ञान विभाग सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुनीत बालन ग्रुप आणि न्यूलिफ लाईफ स्पेसेस तर्फे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या जिऑलॉजी विभागामध्ये आयोजित करण्यात आलेल्या 'इन्व्हेस्टीगेशन मास्टरक्लास' सायबर सुरक्षा संदर्भातील कार्यशाळेचे उद्घाटन डॉ. पराग काळकर यांच्या हस्ते झाले. जीएसटी विभागाच्या अपर महासंचालक वृंदाबा गोहिल, पुणे एटीएसचे एसपी संभाजी कदम, डॉ. आरती दातार, माधुरी सातपुते, लीना सातपुते, प्राजक्ता गिरी, ट्रान्सेडेंटल टेक्नॉलॉजीसचे प्रमुख केतन अत्रे आदी यावेळी उपस्थित होते. डॉ. पराग काळकर म्हणाले, माणसाच्या बँकेतील व्यवहारापासून ते पर्यटन, दैनंदिन जीवन याची सर्व माहिती मोबाईलमध्ये रोजच्या रोज नोंद होत असते. परंतु अनेक जण याबद्दल अनभिज्ञ असतात. मोबाईल ही आज प्रत्येकाची गरज बनली आहे परंतु मोबाईल संदर्भात प्रत्येकालाच संपूर्णतः माहिती नाही, याचाच फायदा सायबर गुन्हेगार उचलतात आणि विशेषतः जेष्ठ नागरिकांची फसवणूक मोठ्या प्रमाणावर केली जाते.

## सदनिकाधारकांना मिळणार स्वतंत्र पुरवणी प्रॉपर्टी कार्ड, कारपेट एरियाची होणार नोंद

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राज्यातील सदनिकाधारकांना आता इमारतीचा पूर्णत्वाचा दाखला मिळाल्यानंतर स्वतंत्र 'पुरवणी प्रॉपर्टी कार्ड' (व्हर्टिकल प्रॉपर्टी कार्ड) मिळणार आहे. सहकार विभागाने घेतलेल्या बैठकीत महारेराच्या नियमानुसार कारपेट एरियाची नोंद कार्डावर करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून, यामुळे सदनिकाधारकांच्या मालकी हक्काचा प्रश्न सुटणार आहे. सदनिकांच्या बाबतीत मालकी हक्क सिद्ध करण्यासाठी महापालिकेकडे कर भरल्याची पावती आणि खरेदी-विक्री करारनामा एवढाच दस्त उपलब्ध असतो. ज्या जागेवर इमारत उभारली आहे, त्या जागेच्या प्रॉपर्टी कार्डवर मात्र गृहनिर्माण सोसायटी अथवा अपार्टमेंट नोंद असते. तसेच, सर्व सदनिकाधारकांची एकत्रित नावे त्यावर असतात. या सर्व पार्श्वभूमीवर व्हर्टिकल इमारतींना प्रॉपर्टी कार्ड देण्याचा प्रस्ताव भूमी अभिलेख विभागाकडून २०१९ मध्ये तयार करण्यात आला. मुख्य प्रॉपर्टी कार्डव्यतिरिक्त प्रत्येक सदनिकाधारकास पुरवणी प्रॉपर्टी कार्ड देण्याची शिफारस त्यामध्ये केली होती. त्यास सरकारने मान्यता दिल्यानंतर त्याची नियमावलीही विभागाकडून तयार करण्यात आली. सर्व प्रक्रिया पूर्ण करूनही हा प्रस्ताव गेल्या काही वर्षांपासून राज्य सरकारकडे प्रलंबित होता. त्यावर निर्णय घेण्यासाठी मागील वर्षी राज्य सरकारने नव्याने समिती नेमली आहे. समिती नेमताना राज्य सरकारने भूमी अभिलेखबरोबरच सहकार, नगरविकास, नोंदणी व मुद्रांक शुल्क विभाग यांच्यासह बांधकाम व्यावसायिकांची क्रेडाई, तसेच पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्थांचा समावेश आहे.




## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त डोणजे येथे भव्य रक्तदान शिबिर; नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पक्ष, खडकवासला ग्रामीणच्या वतीने डोणजे येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. समाजोपयोगी उपक्रम म्हणून आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने रक्तदान केले. या रक्तदान शिबिराला खडकवासला मतदारसंघाचे आमदार मा. भीमराव (आण्णा) तापकीर यांनी प्रमुख उपस्थिती लावली. त्यांनी रक्तदात्यांशी संवाद साधत रक्तदानाचे महत्त्व विशद केले आणि समाजहितासाठी पुढाकार घेणाऱ्या सर्व रक्तदात्यांचे तसेच आयोजकांचे कौतुक केले. यावेळी भाजप युवा मोर्चा पुणे जिल्हाध्यक्ष वैभव (दादा) सोलंकर, दिव्यांग विकास आघाडी पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष बाजीराव पारगे, भाजप खडकवासला ग्रामीण अध्यक्ष नवनाथ (भाऊ) तागुंदे, सचिन (भाऊ) पायगुडे, शरद जावळकर, महिला मोर्चा अध्यक्षा सौ. संतोषीताई दारवटकर, ताराबाई नानगुडे, विठ्ठल ठाकर, नारायण तनपुरे, प्रशांत दारवटकर, विकास गायकवाड, अथर्व जावळकर, हर्षवर्धन पारगे, राज कड्डू, चंद्रकांत यादव यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.



"रक्तदान हेच जीवनदान" या संदेशाला साजेसा हा उपक्रम ठरला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात आलेल्या या रक्तदान शिबिराचे सर्व स्तरांतून स्वागत करण्यात आले. रक्तदानातून अनेक गरजू रुग्णांना जीवनदान मिळणार असून अशा समाजहिताच्या उपक्रमांमध्ये नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# स्वच्छ पुणे मोहिमेला हरताळ

• सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत सार्वजनिक स्वच्छतागृहांची दयनीय अवस्था

**पुणे-लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)**


स्वच्छ आणि सुंदर शहराचा दावा करणाऱ्या पुणे महानगरपालिकेच्या सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील मनपाच्या सार्वजनिक स्वच्छतागृहांची अवस्था मात्र अत्यंत दयनीय असल्याचे वास्तव समोर आले आहे. दैनिक आरंभपर्वने याबाबत "on the spot"पडताळणी मध्ये स्वच्छतेचा नारा फोल ठरला आहे.

वीर बाजी पासलकर चौक (वडगाव) आणि धायरी फाटा येथील स्वच्छतागृहांची पाहणी केली असता सर्वत्र घाणीचे साम्राज्य, दारूच्या रिकाम्या बाटल्या, प्लास्टिकचा कचरा, दुर्गंधी आणि तुंबलेली स्वच्छतागृहे आढळून आली.

या परिसरात आधीच सार्वजनिक स्वच्छतागृहांची कमतरता आहे. त्यात उपलब्ध असलेली स्वच्छतागृहेही वापरण्यायोग्य नसल्याने नागरिक, ज्येष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुलांची मोठी गैरसोय होत आहे. विशेषतः महिलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, मूलभूत सुविधांपासून नागरिक वंचित राहत असल्याची भावना व्यक्त होत आहे.







दैनिक आरंभपर्वने मागील आठवड्यामध्ये या समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधले होते. मात्र त्यानंतरही परिस्थितीत कोणतीही सुधारणा झालेली नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

दैनिक आरंभपर्व – आरंभ एका नव्या पर्वाचा – Epaper : www.aparv.com – On The Spot

शहर स्वच्छतेसाठी साफसफाईची कंत्राटे दिली जात असताना प्रत्यक्षात अशी विदारक परिस्थिती दिसत असेल, तर स्वच्छतेसाठी खर्च होणारा निधी आणि कंत्राटी यंत्रणा नेमकी किती प्रभावीपणे काम करत आहे, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. नियमित साफसफाई होत नसेल तर संबंधित कंत्राटदार आणि जबाबदार अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही नागरिकांकडून होत आहे.

स्वच्छ शहराचा मान राखायचा असेल, तर नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित आणि वापरण्यायोग्य सार्वजनिक स्वच्छतागृहे उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. या गंभीर प्रश्नाकडे लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.


याबाबत सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाच्या सहाय्यक आयुक्त प्रज्ञा पोतदार यांनी, "या स्वच्छतागृहांची लवकरात लवकर साफसफाई करून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल," असे सांगितले.


सुवर्णसंधी!

InDesign ऑपरेटरची गरज आहे!

मासिक पगार

आकर्षक पगार दिला जाईल




✓ अनुभवी आणि कल्पक ऑपरेटर हवा

✓ मासिक पगार (पात्रतेनुसार)

✓ इन-डिझाइन सॉफ्टवेअरचे उत्तम ज्ञान

✓ कामाचे लवचिक तास

संपर्क : ७२७६३१४१४२/८६६७८६५७०२

## थोडक्यात पण महत्वाचे






### चार बेपत्ता मुलांचा शोध; महाराष्ट्र राज्य मिसिंग ग्रुपचे आवाहन

पुणे (आरंभ पर्व) : महाराष्ट्र राज्य मिसिंग ग्रुपच्या वतीने पुणे शहर व परिसरातील चार बेपत्ता मुलांचा शोध घेण्यासाठी सामूहिक पोस्टर प्रसिद्ध करण्यात आले आहे. या पोस्टरमध्ये बेपत्ता मुलांची छायाचित्रे, पत्ता, बेपत्ता झाल्याची तारीख, संबंधित पोलीस स्टेशन व संपर्क क्रमांक देण्यात आले असून, नागरिकांनी माहिती मिळाल्यास तातडीने संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. बेपत्ता मुलांमध्ये ओम सुधीर नरडवे (वय १५) हे १६ मे २०२६ रोजी बेपत्ता झाले असून या प्रकरणाची नोंद स्वारगेट पोलीस स्टेशन येथे आहे. प्रेम शामराव खडसे (वय १५) हे १० फेब्रुवारी २०२६ रोजी बेपत्ता झाले असून त्यांची नोंद सिंहगड रोड पोलीस स्टेशन येथे करण्यात आली आहे. तसेच श्रीश प्रदीप धेंडे (वय १४) हे ६ एप्रिल २०२६ रोजी धायरी फाटा कॅनल परिसरातून बेपत्ता झाले असून या प्रकरणाचा तपास सुरू आहे. अभिषेक गणेश पत्रे (वय ६) हे २५ एप्रिल २०२६ रोजी बेपत्ता झाले असून या प्रकरणाची नोंद पर्वती पोलीस स्टेशन येथे आहे. महाराष्ट्र राज्य मिसिंग ग्रुपचे संस्थापक जनसेवक शिवाभाऊ पासलकर यांनी नागरिकांना हे पोस्टर सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात शेअर करण्याचे तसेच रेल्वे स्थानके, बसस्थानके, शाळा, मंदिरे व सार्वजनिक ठिकाणी लावून या शोध मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. या मुलांबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास संबंधित पोस्टरवरील संपर्क क्रमांकांवर किंवा शिवाभाऊ पासलकर ९३२६४२५८५८ या क्रमांकावर तात्काळ संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



### उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त पूरग्रस्तांना मदतीचा हात

पुणे (आरंभ पर्व) : महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व शिवसेना पक्षप्रमुख उद्धव साहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त खडकवासला मतदारसंघात सामाजिक बांधिलकी जपत पूरग्रस्त कुटुंबांना किराणा साहित्याचे वाटप करण्यात आले. जून महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे कोंढवे धावडे परिसरातील अनेक घरांमध्ये पुराचे पाणी शिरून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. नुकसानीचे पंचनामे होऊनही संबंधित कुटुंबांना अद्याप कोणतीही शासकीय मदत मिळालेली नसल्याची बाब समोर आल्यानंतर शिवसेना खडकवासला मतदारसंघातील पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घेत पूरग्रस्तांना जीवनावश्यक किराणा साहित्याचे वाटप केले. हा उपक्रम विधानसभा प्रमुख शिवाजी मते आणि नांदेड सिटीचे संचालक राहुल घुले पाटील यांच्या हस्ते पार पडला. यावेळी माजी पंचायत समिती सदस्य नितीन वाघ, अविनाश सरोदे, उपविभाग प्रमुख शांताराम पढेर, रामदास गायकवाड, सुरेश किंडरे, आकाश पायगुडे, निसर्ग धावडे आणि पुंडलिक धावडे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन सौरभ मोकाशी आणि पप्पू अण्णा गायकवाड यांनी केले. उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात आलेल्या या सामाजिक उपक्रमाबद्दल सर्वच स्तरातून कौतुक व्यक्त करण्यात आले.





### सारोळे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

बार्शी (आरंभ पर्व) : बार्शी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सारोळे येथील विद्यार्थ्यांनी इयत्ता चौथी शिष्यवृत्ती परीक्षा 2025-26 मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. शाळेतील 13 विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली असून त्यापैकी 3 विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले, तर एका विद्यार्थ्याला अवघ्या दोन गुणांनी शिष्यवृत्ती हुकली. यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये अनुष्का बालाजी गाटे, आयुष किशोर साबळे आणि मेघना देवानंद शिंदे यांचा समावेश आहे. या विद्यार्थ्यांना वर्गशिक्षक सचिन गावसाने यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांनी हे यश संपादन केले. विशेष म्हणजे, शिक्षकांना एस.आय .आर,बी.एल.ओ. यांसारखी विविध शालेय व शालेयबाह्य प्रशासकीय कामे सांभाळावी लागत असतानाही, विद्यार्थ्यांच्या अभ्यासाकडे दुर्लक्ष न करता त्यांनी दिलेले दर्जेदार मार्गदर्शन निश्चितच कौतुकास्पद आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल मुख्याध्यापक शाहू बाबर सर, शिक्षक अनिलकुमार गवळी ,शिक्षिका सौ. वैशाली जांभळे , शालेय व्यवस्थापन समिती, ग्रामपंचायत प्रशासन तसेच सर्व ग्रामस्थांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि वर्गशिक्षक सचिन गावसाने यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

### समाजसेविका डॉ. वैशाली पाटील यांना आंतरराष्ट्रीय मानद डॉक्टरेट



पुणे/नवी दिल्ली (आरंभ पर्व) : समाजसेवा क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत इंटरनॅशनल इंटर्नशिप युनिव्हर्सिटी (IIU)च्या इंटरनॅशनल ॲडव्हायझरी ॲंड ॲकॅडमिक बोर्डतर्फे समाजसेविका डॉ. वैशाली पाटील यांना 'ऑनररी डॉक्टरेट इन सोशल वर्क' ही आंतरराष्ट्रीय मानद डॉक्टरेट प्रदान करण्यात आली. नवी दिल्ली येथे २७ जुलै २०२६ रोजी आयोजित '२० वा फाउंडेशन डे सेलिब्रेशन', 'आयकॉनिक भारत कॉन्क्लेव्ह' आणि 'नॅशनल एक्सलन्स अवॉर्ड्स २०२६' या सोहळ्यात डॉ. पाटील यांना हा बहुमान प्रदान करण्यात आला. समाजहित, महिला सक्षमीकरण, आरोग्य जनजागृती, शिक्षण, पर्यावरण संवर्धन तसेच विविध सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांनी केलेल्या सातत्यपूर्ण कार्याची दखल घेत त्यांची या सन्मानासाठी निवड करण्यात आली. कुसुमवत्सल्य फाउंडेशन ट्रस्ट, पुण्येच्या संस्थापक अध्यक्षा म्हणून डॉ. वैशाली पाटील गेल्या अनेक वर्षांपासून वंचित व गरजू घटकांसह महिला, विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध सामाजिक उपक्रम राबवत आहेत.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त

# ५,००० विद्यार्थ्यांना परीक्षा पॅड वाटप मोहिमेचा शुभारंभ

### मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिराही प्रतिसाद




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त खडकवासला विधानसभा मतदारसंघात ५,००० विद्यार्थ्यांना परीक्षा पॅड वाटप, तसेच भव्य रक्तदान शिबिर उत्साहात पार पडले. या विद्यार्थ्यांना पॅड वाटप ह्या समाजोपयोगी उपक्रमाचा शुभारंभ नऱ्हे येथील जाधवर शैक्षणिक संकुलात उत्साहात झाला. कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार भीमराव तापकीर तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अधिसभा सदस्य व बँक ऑफ महाराष्ट्रचे संचालक प्रसेनजीत फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. पुणे महानगरपालिकेचे नगरसेवक हरिदास कृष्णा चरवड यांच्या पुढाकारातून राबविण्यात येणारा हा उपक्रम मुख्यमंत्री फडणवीस यांनी वाढदिवसानिमित्त फ्लेक्सबाजी व अनावश्यक खर्च टाळून समाजोपयोगी कार्य करण्याच्या केलेल्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून दरवर्षी आयोजित केला जातो. यंदाही खडकवासला मतदारसंघातील शहरी व ग्रामीण भागातील ५,००० विद्यार्थ्यांना परीक्षा पॅडचे वितरण करण्यात येणार आहे. उपक्रमाच्या प्रारंभी जाधवर स्कूल (नऱ्हे), यशवंत विद्यालय (खडकवासला), व्यंकटेश्वरा स्कूल (गोऱ्हे खुर्द) आणि काळभैरवनाथ माध्यमिक विद्यालय (मालखेड) येथील विद्यार्थ्यांना परीक्षा पॅडचे वाटप करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना अभ्यासाचे महत्त्व, वेळेचे नियोजन, स्पर्धा परीक्षांची तयारी आणि उज्ज्वल भविष्यासाठी प्रेरणादायी मार्गदर्शन करण्यात आले. जाधवर एज्युकेशन इन्स्टिट्यूटचे संस्थापक अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर यांनी उपक्रमाचे कौतुक करत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे सांगितले. यावेळी सुहास पवार, तेजस कुटे, अण्णासाहेब वाल्हेकर, भाजप प्रभाग अध्यक्ष राजूदादा कुटे, माजी उपसरपंच सुशांत कुटे, संदीप चरवड, पंकज फुले, महिला शहर उपाध्यक्ष कोमल कुटे, शिक्षक, पालक, विद्यार्थी आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित रक्तदान शिबिरास चांगला प्रतिसाद मिळाला. रक्तदान ही काळाची गरज असल्याने आपण सर्वांनी रक्तदान करावे अशी भावना उपस्थित मान्यवरांनी बोलून दाखवली.

### कोल्हेवाडीत रक्तदान शिबिर; १४७ रक्तपिशव्यांचे संकलन



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला विधानसभा मतदारसंघातील कोल्हेवाडी येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने माजी उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. समाजोपयोगी उपक्रम म्हणून आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, एकूण १४७ रक्तपिशव्यांचे संकलन करण्यात आले. या उपक्रमाचे आयोजन राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे खडकवासला विधानसभा अध्यक्ष सागर कोल्हे यांनी केले होते. गेल्या पाच वर्षांपासून सातत्याने राबविण्यात येणाऱ्या या रक्तदान शिबिराने समाजसेवेची परंपरा कायम राखली असून, यंदाही मोठ्या संख्येने युवक आणि नागरिकांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे खडकवासला विधानसभा अध्यक्ष बाबा धुमाळ, तनवीर शेख, संजय ठोबरे, दर्शन रायकर, गणेश रिढे, राजेंद्र कोल्हे, अमित कोल्हे, महेश कड्डू, संतोष हरकळ, राहुल कोल्हे, वैभव माळी , ब्लड बँकचे रुपेश पाटकुलकर यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित करत, रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असल्याचे सांगितले. अशा समाजोपयोगी उपक्रमांमुळे गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध होण्यास मोठी मदत होत असल्याचे सांगितले.

## दहावीतील टॉपर २१ विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा संपन्न



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सारथी रुग्णहक्क जनसेवा ट्रस्ट, महाराष्ट्र राज्य आणि संहिता प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने दहावीतील गुणवंत व टॉपर २१ विद्यार्थ्यांचा "आदर्श विद्यार्थी पुरस्कार" प्रदान करून विशेष गौरव करण्यात आला. यानिमित्त विद्यार्थ्यांसाठी विशेष भोजनाचे आयोजनही करण्यात आले होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आपल्या आत्मसन्मानाची अनोखी अनुभूती मिळाली. कार्यक्रमाला पिंपरी-चिंचवडचे पोलीस उपायुक्त गणेश इंगळे, मावळचे गटविकास अधिकारी (उच्च श्रेणी) कुलदीप प्रधान, शिक्षणतज्ज्ञ डॉ. बाळासाहेब काळे तसेच उद्योजक अमित शेठ कदम यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना पोलीस उपायुक्त गणेश इंगळे म्हणाले, "नोकरी मिळवणे हे अंतिम ध्येय नसून, मिळालेल्या पदाचा उपयोग प्रामाणिकपणे जनसेवा आणि राष्ट्रसेवेसाठी करणे अधिक महत्त्वाचे आहे. समाजाकडून घेण्यापेक्षा समाजाला काहीतरी देण्याची वृत्ती प्रत्येक तरुणाने जोपासली पाहिजे. प्रत्येक मोठ्या परिवर्तनाची सुरुवात स्वतःपासूनच होते." गटविकास अधिकारी कुलदीप प्रधान यांनी स्पर्धा परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना प्रेरणा देताना सांगितले की, "यश हे नशिबाने नव्हे, तर जिद्द, शिस्त, सातत्य आणि कठोर परिश्रमाने मिळते. नियमित अभ्यास, उजळणी आणि वेळेचे नियोजन यामुळे कोणतेही ध्येय गाठता येते."

शिक्षणतज्ज्ञ डॉ. बाळासाहेब काळे यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून सांगितले की, "मोठी स्वप्ने पाहा, त्यांना कृतीची जोड द्या आणि घेतलेल्या निर्णयावर ठाम राहून सातत्याने प्रयत्न करा. योग्य निर्णय, आत्मविश्वास आणि परिश्रम यांच्या जोरावर प्रत्येक स्वप्न वास्तवात उतरते."

सारथी रुग्णहक्क जनसेवा ट्रस्ट, महाराष्ट्र राज्यचे अध्यक्ष दिपक हरिभाऊ चौघुले यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना "विचार मोठे ठेवा, स्वप्ने पाहा आणि ती पूर्ण करण्यासाठी अखंड प्रयत्न करा. निश्चितच यश तुमच्या पावलांशी येईल," असा प्रेरणादायी संदेश दिला. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ट्रस्टचे योगेश रोहिदास शेवाळे, कुलदीप हरिश्चंद्र नाईकनवरे, सारिका संतोष लोणकर, पद्मजा गणेश गव्हाणे, आकाश भारत झांबरे, सागर नंदकुमार जगताप, राहुल नाईक सागर करंडे आणि श्रेयस दिपक चौघुले यांनी विशेष परिश्रम घेतले. दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान, प्रेरणादायी मार्गदर्शन आणि फाईव्ह स्टार हॉटेलमधील भोजनाचा अनोखा अनुभव यामुळे हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी संस्मरणीय ठरला. उपस्थितांनी या उपक्रमाचे कौतुक करत अशा प्रेरणादायी कार्यक्रमांचे आयोजन सातत्याने व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

## पालिकेतील बनावट भरतीचे रॅकेट रोखा; कंत्राटी कामगारांना कायम करा

**मनसेचे पुणे महापालिका आयुक्तांना निवेदन; कोविड काळात सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्राधान्याने न्याय देण्याची मागणी**



सुहास भगवानराव निम्हण

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिकेत कथित बनावट भरतीच्या माध्यमातून बेरोजगार तरुणांची फसवणूक करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, तसेच वर्षानुवर्षे पालिकेत सेवा देणाऱ्या कंत्राटी कामगारांना 'समान हक्क' तत्त्वानुसार कायमस्वरूपी सेवेत सामावून घ्यावे, अशी आग्रही मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने केली आहे. विशेषतः कोरोना काळात जीव धोक्यात घालून सेवा बजावलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना प्राधान्याने न्याय द्यावा, अशी मागणीही करण्यात आली आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पुणे शहर उपाध्यक्ष सुहास भगवानराव निम्हण यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी (दि. २७) पुणे महापालिका आयुक्त तसेच सामान्य प्रशासन विभागाला याबाबत निवेदन देण्यात आले.

पुणे महापालिकेची हद्द वाढल्याने आणि नवीन गावांचा समावेश झाल्याने पालिकेच्या कामाचा व्याप मोठ्या प्रमाणात वाढला आहे. मात्र, अनेक वर्षांपासून पालिकेच्या विविध विभागांत कार्यरत असलेल्या कंत्राटी कामगारांना कायमस्वरूपी सेवेत सामावून घेण्याऐवजी कंत्राटी पद्धतीवर अवलंबून राहण्याचे धोरण सुरू असल्याचा आरोप मनसेने निवेदनातून केला आहे.

पालिकेचा बनावट लोगो, खोटे शिक्के, अधिकाऱ्यांच्या बनावट स्वाक्षऱ्या, नियुक्तीपत्रे, वेतनपत्रके तसेच बँकेची बनावट कागदपत्रे तयार करून महापालिकेत नोकरी लावण्याच्या नावाखाली बेरोजगार तरुणांची आर्थिक फसवणूक केली जात असल्याचे प्रकार माध्यमांतून समोर आल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. या कथित बनावट भरती रॅकेटची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी मनसेने केली आहे. कोरोना महामारीच्या काळात शहर संकटाचा सामना करत असताना कंत्राटी कर्मचाऱ्यांनी स्वतःचे आणि कुटुंबीयांचे आरोग्य धोक्यात घालून सेवा बजावली. अशा 'कोविड योद्ध्यांना' सर्वप्रथम न्याय मिळाला पाहिजे, अशी भूमिका मनसेने मांडली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून अत्यल्प वेतनावर काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या कुटुंबांचे आर्थिक व सामाजिक नुकसान होत आहे. त्यांच्या कुटुंबाचे जीवनमान, मुलांचे शिक्षण आणि भवितव्य यांचाही प्रशासनाने गांभीर्याने विचार करण्याची गरज असल्याचे निवेदनात म्हटले आहे. नव्याने महापालिकेत समाविष्ट झालेल्या ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या धर्तीवर पालिकेत अनेक वर्षांपासून कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना, विशेषतः कोविड काळात सेवा बजावलेल्या कर्मचाऱ्यांना, जाचक अटी न लावता कायमस्वरूपी सेवेत सामावून घेण्यासाठी धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी प्रमुख मागणी मनसेने केली आहे.

### अन्यथा 'मनसे स्टाईल' आंदोलनाचा इशारा

"पुणे शहरातील कोणत्याही कंत्राटी कामगारावर अन्याय होऊ दिला जाणार नाही. त्यांच्या हक्काचा न्याय मिळेपर्यंत महाराष्ट्र नवनिर्माण सेना त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहील," अशी भूमिका सुहास निम्हण यांनी मांडली. कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या प्रश्नावर प्रशासनाने तातडीने सकारात्मक तोडगा काढावा. अन्यथा पुणे महानगरपालिकेसह संपूर्ण शहरात 'मनसे स्टाईल'ने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.



### कजारिया कंपनीकडून ॲडहेसिव्ह एक्सपीरियन्स सेंटरचे उद्घाटन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतातील आघाडीची टाईल्स उत्पादक कंपनी कजारिया सिरेमिक्स लिमिटेड यांनी पुण्यातील शिवाजीनगर येथे अत्याधुनिक कजारिया आणि केरोविट एक्सपीरियन्स सेंटर सुरू केले आहे. देशातील सर्वात मोठ्या अशा या केंद्राचे उद्घाटन कजारिया सिरेमिक्स लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक ऋषी कजारिया यांच्या हस्ते करण्यात आले. शिवाजीनगर येथील डीएसके गंधर्व हाइट्स, कृषी महाविद्यालयाजवळ असलेल्या या १५,००० चौरस फूट क्षेत्रफळाच्या केंद्रात ग्राहक, वास्तुविशारद, इंटिरिअर डिझायनर आणि बांधकाम व्यावसायिकांना टाईल्स, बाथवेअर आणि ॲडहेसिव्ह उत्पादनांची विस्तृत श्रेणी एकाच छताखाली पाहण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. हे केंद्र तीन मजल्यांवर पसरले असून येथे कजारिया टाईल्स, युनीटेरा व अल्टिमा या मोठ्या आकाराच्या स्लॅब्स, केरोविट बाथवेअर तसेच ग्रेसबॉण्ड ॲडहेसिव्ह उत्पादने प्रदर्शित करण्यात आली आहेत. यावेळी बोलताना ऋषी कजारिया म्हणाले, "भारतातील प्रत्येक कुटुंबाला उत्कृष्ट टाईल्स व बाथ सोल्युशन्स उपलब्ध करून देणे हे आमचे ध्येय आहे. पुण्यातील हे नवीन एक्सपीरियन्स सेंटर ग्राहकांना जागतिक दर्जाच्या उत्पादनांचा आणि संपूर्ण जीवनशैली समाधानांचा अनुभव देईल."

- **पत्ता : कजारिया व केरोविट एक्सपीरियन्स सेंटर डीएसके गंधर्व हाइट्स, कृषी महाविद्यालयाजवळ, शिवाजीनगर, पुणे**

# जिल्हा सैनिक कार्यालयाकडून माजी सैनिकांसाठी तत्पर सेवा




**वैराग (दै. आरंभ पर्व)**

माजी सैनिक, वीर पत्नी ,वीर माता तसेच त्यांच्या कुटूंबियांना वेळेत आणि कार्यक्षम सेवा देण्याचे काम जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय करत असते. शनिवारी आषाढी निमित्त सार्वजनिक सुट्टी असताना देखील माजी सैनिकांच्या पाल्याच्या ॲडमिशन साठी आवश्यक प्रमाणपत्र देण्यात आले. अन्यथा काही विद्यार्थ्यांना सैनिक कोट्यातील प्रवेशापासून मुकावे लागले असते. सीईटी परीक्षेचा निकाल नुकताच लागला आहे. अभियांत्रिकी ॲडमिशन साठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सध्या सुरू आहे. सैनिकांच्या पाल्यांना त्यांच्या कोट्यातून प्रवेश मिळण्यासाठी आवश्यक असणाऱ्या परफॉर्म बी या फॉर्ममध्ये अचानक बदल केल्याने कांही विद्यार्थ्यांना सैनिक कोट्यातील प्रवेशापासून वंचित राहावे लागले असते. मात्र अधिकाऱ्यांच्या कार्यतप्तरतेने सुट्टीच्या दिवशीही विद्यार्थ्यांना आवश्यक असणारे प्रमाणपत्र दिल्याने विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान टळले आहे. आषाढी वारीसाठी जिल्हा सैनिक कल्याण केंद्र येथील सर्व कर्मचारी पंढरपूरला ड्युटीवर कार्यरत होते. त्यातच शनिवार व रविवार सुट्टीचा दिवस होता. शुक्रवारी 24 जुलै रोजी सायंकाळी विद्यार्थ्यानी अभियांत्रिकीसाठी भरलेल्या फॉर्म मधील त्रुटीची दुरुस्ती करण्यासाठी जाहीर करण्यात आले. माजी सैनिक असणाऱ्या पाल्यासाठी नवीन परफॉर्म सी दुरुस्त करण्याचे सूचना देण्यात आली, त्यामुळे ते प्रमाणपत्र जिल्हा सैनिक कार्यालयाकडून घेवुन अपलोड केल्यानंतरच विद्यार्थ्यांना माजी सैनिक कोट्याचा लाभ मिळणार होता. अन्यथा सर्वसाधारण कोट्यामधून त्यांना प्रवेश घ्यावा लागला असता. त्यांचा चांगल्या कॉलेजमध्ये नंबर लागला नसता. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले असते. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याचे गांभीर्य ओळखून जिल्हा सैनिक केंद्राचे अधिकारी मिलिंद देवदत्त तुंगार यांनी आषाढी वारीला सर्व स्टाफ ड्युटीवर असताना देखील माजी सैनिकांच्या पाल्यासाठी सैनिक हॉस्टेलच्या कर्मचाऱ्यांचे सहकार्य घेऊन व सैनिक कल्याण कार्यालयातील श्रीमती पूजा श्री. बनसोडे श्री. मारुती शेंबडे यांच्याशी समन्वय साधून प्रमाणपत्र देण्याचे काम वेळेत पूर्ण केले.

जिल्हा सैनिक कल्याण केंद्रातील अधिकारी मिलींद तुंगार यांनी मला स्वतःला ऑफीसमध्ये बोलवून माझ्या मुलीच्या इंजिनिअरिंग प्रवेश फार्म साठी आवश्यक असणाऱ्या परफॉर्मा बी फॉर्मवर सही दिली. आमच्या कामाची गरज बघून त्यांनी लगेच कारवाई केली. त्यामुळे एका अर्थाने आषाढी एकादशीला आमच्यासाठी तुंगार साहेब जणू विठ्ठल म्हणून धावून आले.





## थोडक्यात पण महत्वाचे



### नूतन इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये आषाढी एकादशी उत्साहात साजरी

धायरी (पुणे) (आरंभ पर्व) : नूतन इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये आषाढी एकादशीचा पवित्र सण भक्तिमय वातावरणात मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज तसेच वारकरी संप्रदायाच्या वेशभूषेत सहभागी होत संपूर्ण परिसर भक्तिरसाने भारावून टाकला. कार्यक्रमाची सुरुवात श्री विठ्ठल-रुक्मिणी यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. विद्यार्थ्यांनी "ज्ञानोबा-तुकाराम" च्या जयघोषात टाळ-मृदंगाच्या गजरात दिंडी काढली. अभंग, भजन आणि वारकरी परंपरेवरील सादरीकरणातून विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राची समृद्ध संस्कृती आणि भक्ती परंपरा अनुभवली. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना आषाढी वारीचे महत्त्व, संतांचे विचार, सामाजिक समता, सेवा आणि भक्तीचे संस्कार यांची माहिती देण्यात आली. शिक्षकांनीही विद्यार्थ्यांना वारकरी परंपरेचे महत्त्व समजावून सांगितले. या प्रसंगी शाळेच्या संस्थापिका सौ. सुनिता डांगे, विवेक माळवदे राजाराम डांगे मुख्याध्यापिका प्रियांका गुजराती तसेच शिक्षक उपस्थित होते प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना संतांच्या शिकवणीचे आचरण करून प्रेम, शिस्त, सहकार्य आणि मानवतेची मूल्ये जोपासण्याचा संदेश दिला. या भक्तिमय आणि संस्कारमय कार्यक्रमामुळे शाळेचे वातावरण विठ्ठलनामाच्या गजराने दुमदुमून गेले आणि विद्यार्थ्यांसह पालकांनीही या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले.



### बाल दिंडी सोहळ्याने किरकटवाडी मनपा शाळा भक्तिमय

पुणे (आरंभ पर्व) : किरकटवाडी येथील पुणे महानगरपालिका शाळेत आषाढी एकादशीच्या निमित्ताने पारंपरिक पालखी व बाल दिंडी सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या सोहळ्यास किरकटवाडी ग्रामपंचायतीचे माजी सरपंच गोकुळ निवृत्ती करंजावणे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य संतोष बांदल, प्रवीण दिघे, जयश्री पठारे, दिपाली सावंत यांच्यासह पालक, ग्रामस्थ आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी विद्यार्थ्यांच्या आकर्षक सादरीकरणाचे कौतुक केले. कार्यक्रमाची सुरुवात ढोल-ताशा आणि लेझीमच्या गजरात झाली. वारकरी वेशभूषेत सजलेल्या विद्यार्थ्यांनी खांद्यावर पालखी घेत हरिनामाचा गजर करत दिंडी काढली. नऊवारी साडी परिधान केलेल्या विद्यार्थिनींनी भजन-कीर्तन सादर करून वातावरण भक्तिमय केले. प्रत्येक वर्गाची दिंडी विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात पोहोचल्यानंतर आरती करण्यात आली. या सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेच्या प्रभारी मुख्याध्यापिका सौ. संगीता कुरुणकर आणि शिक्षकवर्ग यांनी विशेष परिश्रम घेतले. हलक्या पावसाच्या सरींनीही या सोहळ्याची रंगत अधिकच वाढवली. वारकरी परंपरेचा संस्कार विद्यार्थ्यांमध्ये रुजविणारा हा उपक्रम उपस्थितांच्या विशेष पसंतीस उतरला. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि वारकऱ्यांचा भक्तिभाव हे या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले.

### जयंतीनिमित्त धायरीतील अंगणवाडीत चिमुकल्यांना फळवाटप



पुणे (आरंभ पर्व) : महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त धायरी गावातील पोकळे अंगणवाडी येथे लहान बालकांना फळांचे वाटप करण्यात आले. हा समाजोपयोगी उपक्रम सामाजिक कार्यकर्ते श्री. तुषार श्रीहरी पोकळे यांनी आयोजित केला. बालकांच्या आरोग्याची जपणूक, पोषणाविषयी जनजागृती आणि समाजाप्रती सामाजिक बांधिलकी जपण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी अंगणवाडीतील चिमुकल्यांना विविध पौष्टिक फळांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे बालकांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला. यावेळी वाढदिवस आणि जयंतीनिमित्त सामाजिक उपक्रम राबविण्याची परंपरा अधिक बळकट करण्याचे आवाहन केले. रक्तदान, वृक्षारोपण, फळवाटप यांसारख्या समाजहिताच्या उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक संदेश जात असल्याचे त्यांनी सांगितले. तुषार श्रीहरी पोकळे यांच्या या उपक्रमाचे नागरिक आणि पालकांनीही कौतुक केले.

### दैनंदिन जीवन अधिक सुंदर बनवणाऱ्या ‘शांत लक्झरी’च्या कालातीत वस्तू



पुणे (आरंभ पर्व) : आजच्या आधुनिक जीवनशैलीत लक्झरीची व्याख्या झपाट्याने बदलत आहे. केवळ भपकेबाज सजावटीपेक्षा साधेपणा, दर्जा आणि उपयुक्तता यांना अधिक महत्त्व दिले जात आहे. याच संकल्पनेला साकार करणारे फॅबइंडियाचे कालातीत होम कलेक्शन "क्वाएट लक्झरी" म्हणजेच शांत, सुसंस्कृत आणि प्रामाणिक जीवनशैलीचा अनुभव देणारे ठरत आहे. हस्तकला आणि आधुनिक डिझाइनचा सुंदर संगम असलेल्या या वस्तू घराच्या सौंदर्यात भर घालण्यासोबतच दैनंदिन वापरासाठीही उपयुक्त आहेत. या कलेक्शनमधील ब्राऊन ऑलिव्हर मँगो वूड कोट स्टँड (एमआरपी ₹11,499) हा आकर्षक आणि टिकाऊ आंब्याच्या लाकडापासून तयार करण्यात आला आहे. 46 x 46 x 165.5 सेंमी आकाराच्या या फ्लोअर हँगरला मजबूत बेस असल्याने तो स्थिर राहतो. वरच्या आणि मध्यभागी दिलेले हुक्स कोट, टोपी, बॅग तसेच दैनंदिन वापरातील वस्तू टांगण्यासाठी उपयुक्त आहेत. बेडरूम किंवा घराच्या प्रवेशद्वाराला हा स्टँड आधुनिक आणि देखणा लूक देतो. साईड टेबल आणि सिरेमिक फुलदाणीसोबत त्याची मांडणी केल्यास घराचा लूक अधिक आकर्षक दिसतो. याच कलेक्शनमधील आहान फ्लोअर लॅम्प (शेडशिवाय) (एमआरपी ₹12,999) हा घरातील प्रकाशयोजनेला नवी ओळख देणारा आहे. हाताने रंगविलेला लाकडी बेस असलेला हा लॅम्प लिव्हिंग रूम किंवा वाचनाच्या कोपऱ्यात उबदार, शांत आणि आमंत्रक वातावरण निर्माण करतो. आरामदायी खुर्ची, टेक्स्चर असलेले थ्रो आणि काही निवडक पुस्तकांसह हा लॅम्प ठेवला तर घरात एक सुंदर आणि प्रेरणादायी वाचनाचा कोपरा सहज तयार होऊ शकतो.

## रोटरॅक्ट क्लब ऑफ दौंडच्या अध्यक्षपदी कार्तिकी पालसांडे, सचिवपदी धीरज शासम

**दौंड (दै. आरंभ पर्व)**

रोटरॅक्ट क्लब ऑफ दौंडच्या वर्ष २०२६-२७ साठी अध्यक्षपदी रोटरॅक्टर कार्तिकी पालसांडे तर सचिवपदी रोटरॅक्टर धीरज शासम यांनी पदभार स्वीकारला. क्रिएटिव्ह कॉम्प्युटर्स, दौंड येथे वारकरी संप्रदायाच्या भक्तिमय वातावरणात आणि आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर हा पदग्रहण सोहळा उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात 'Go Green Initiative' अंतर्गत पवित्र तुळशी वृंदावनास जलार्पण करून करण्यात आली. यावेळी Chief Guest PHF DRR Rtr. Dr. Karishma Awari तसेच Honourable Chief Guest Rotarian Payal Bhandari यांच्या हस्ते हरित उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.



मावळते अध्यक्ष रोटरॅक्टर अनुराग सरोदे आणि मावळते सचिव रोटरॅक्टर ऋतुकेश हंचाटे यांनी नव्या पदाधिकाऱ्यांकडे पदभार सुपूर्द केला.

या सोहळ्यास पुणे जिल्ह्यातील विविध पदाधिकारी, DRR टीम सदस्य रोटरॅक्टर प्रज्वल बांडे व रोटरॅक्टर प्रेम बनसोडे यांची विशेष उपस्थिती लाभली. तसेच कार्तिकी पालसांडे यांच्या पहिल्या शाळेच्या शिक्षिका रोटेरियन सविता भोर मॅडम, माजी अध्यक्ष रोटेरियन दीपक शासम, नूतन शासम,रोटरॅक्ट क्लबचे युथ डायरेक्टर विश्वनाथ शिंदे,राकेश अग्रवाल, सविता पालसांडे ,गणेश पालसांडे, डॉ. राजेश दाते, महेश दरेकर , सुनील ढगे सर, उल्हास मिसाळ सर, राहुल कडाळे, गणेश हाके, सीमा घाडगे मॅडम, डॉ. सुषमा भोर, डॉ. लोणकर मॅडम, सरोजा बहीणवाल यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

नवनियुक्त अध्यक्षा कार्तिकी पालसांडे यांनी आपल्या एक वर्षांच्या कार्यकाळात सर्व सदस्यांना सोबत घेऊन सामाजिक बांधिलकी जपत शिक्षण, आरोग्य, पर्यावरण संवर्धन, युवा नेतृत्व विकास, महिला सक्षमीकरण आणि सेवाभावी उपक्रम प्रभावीपणे राबविण्याचा संकल्प व्यक्त केला. समाजहिताला प्राधान्य देत समर्पित भावनेने कार्य करून रोटरॅक्ट क्लब ऑफ दौंडचे नाव अधिक उंचावण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

हा पदग्रहण सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला असून उपस्थित मान्यवरांनी तसेच तिची आई सविता पालसांडे आणि बहिण संस्कृती पालसांडे यांनीही नव्या कार्यकारिणीला शुभेच्छा देत त्यांच्या भावी सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

## विवोचा ‘T5e’ स्मार्टफोन लाँच; ५५०० एमएएच बॅटरीसह किंमत ₹१३,९९९

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

विवो इंडियाने नव्या पिढीतील स्मार्टफोन वापरकर्त्यांसाठी ‘विवो T5e’ हा नवीन स्मार्टफोन भारतीय बाजारपेठेत लाँच केला आहे. विद्यार्थी आणि तरुण व्यावसायिकांच्या दैनंदिन गरजा लक्षात घेऊन तयार करण्यात आलेल्या या स्मार्टफोनमध्ये ५५०० एमएएच बॅटरी, ९० हर्ट्झ रिफ्रेश रेटचा डिस्प्ले, अँड्रॉइड १६ आधारित ओरिजिन ओएस ६ तसेच विविध कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित सुविधा देण्यात आल्या आहेत. विवो T5e च्या ४ जीबी रॅम आणि ६४ जीबी स्टोरेज असलेल्या प्रकाराची किंमत ₹१३,९९९ निश्चित करण्यात आली आहे. ही किंमत सर्व करांसहित असून बँक सवलती स्वतंत्र असतील. हा स्मार्टफोन विवोच्या अधिकृत संकेतस्थळासह फ्लिपकार्ट आणि देशभरातील अधिकृत विक्री केंद्रांवर उपलब्ध करण्यात आला आहे. विवो T5e मध्ये ५५०० एमएएच




क्षमतेची बॅटरी देण्यात आली आहे. कंपनीच्या दाव्यानुसार ही बॅटरी १८ तासांपर्यंत ऑनलाइन व्हिडिओ, ४७ तासांपर्यंत संगीत, १३.५ तासांपर्यंत समाजमाध्यमांचा वापर आणि २८ तासांपर्यंत व्हॉइस कॉलसाठी साथ देऊ शकते. स्मार्टफोनमध्ये ‘बॅटरी लाईफ एक्सटेंडर’, ‘सुपर बॅटरी सेव्हर मोड’, ‘अॅडॅप्टिव्ह बॅटरी सेव्हर’, ‘स्लीप स्टँडबाय ऑप्टिमायझेशन’ आणि चार्जिंग संरक्षणासारख्या सुविधा देण्यात आल्या आहेत. फोनमध्ये १५ वॅट फास्ट चार्जिंगसह रिव्हर्स चार्जिंगची सुविधाही आहे. बॅटरी चार वर्षांपर्यंत कार्यक्षम राहण्यासाठी आवश्यक तंत्रज्ञान वापरल्याचा दावा कंपनीने केला आहे.

## ‘फरांदे स्पेसेस’ने मांडला पुण्यातील बदलत्या निवासी मालमत्ता बाजाराविषयीचा आपला दृष्टिकोन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

‘फरांदे स्पेसेस’ या पुण्यातील अग्रगण्य आणि विश्वासार्ह रिअल इस्टेट विकासकाने महत्त्वाच्या व्यावसायिक टप्प्यांची घोषणा करताना पुण्यातील बदलत्या निवासी मालमत्ता बाजाराविषयीचा आपला दृष्टिकोन मांडला आहे. गेल्या ३० वर्षांच्या प्रवासात आणि १.२ कोटी चौरस फूटांहून अधिक बांधकाम पूर्ण करून कंपनीने वुड्सव्हिल, पुणेव्हिल, वान्या, कैरोसा आणि वारिवना यांसारख्या एकात्मिक टाउनशिप प्रकल्पांद्वारे आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. सध्या पीसीएमसी आणि पुणे परिसरात कंपनीकडे १०० एकरांहून अधिक क्षेत्रावर निवासी आणि व्यावसायिक प्रकल्प विकसित होत आहेत. ‘फरांदे स्पेसेस’चे व्यवस्थापकीय संचालक आकाश फरांदे यांच्या मते, २०२५-२६ या कालावधीत पुण्याची निवासी मालमत्ता बाजारपेठ मोठ्या परिवर्तनातून जात आहे. जानेवारी ते नोव्हेंबर २०२५ या कालावधीत शहरात १.७० लाखांहून अधिक मालमत्ता नोंदणी झाली असून, गेल्या चार वर्षांतील ही सर्वोत्तम कामगिरी आहे. मात्र, बाजारपेठेचा कल आता स्पष्टपणे प्रीमियम आणि लक्झरी गृहप्रकल्पांकडे वळला आहे. ‘सन २०२५ मध्ये पुण्यातील घरविक्रीत २० टक्क्यांची घट झाली असली, तरी प्रत्यक्षात उच्च मूल्याच्या व्यवहारांमध्ये मोठी वाढ झाली आहे. परवडणाऱ्या घरांच्या विभागातील ग्राहकांनी काही काळ खरेदी थांबवली असली, तरी मध्यम-प्रीमियम आणि लक्झरी घरे नोंदणीला चालना देत आहेत.

## अॅड. प्रा. सदाशिव माळगे यांना पुरस्कार प्रदान

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारताचे माजी राष्ट्रपती, भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित राज्यस्तरीय सोहळ्यात अक्कलकोट तालुक्यातील आळगे गावचे सुपुत्र अॅड. प्रा. सदाशिव माळगे यांना ‘डॉ. कलाम राष्ट्र उभारणी प्रेरणा पुरस्कार-२०२६’ प्रदान करून गौरविण्यात आले.

ड्रीम फाऊंडेशन, डॉ. कलाम कौशल्य विकास केंद्र, पुणे, चाणक्य गुरुकुल अकॅडमी आणि बसव संगम शेतकरी गट यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यातील मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्स, हडपसर पुणे येथे हा भव्य पुरस्कार सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन माजी डीआरडीओ वरिष्ठ वैज्ञानिक डॉ. अशोक जी. नगरकर यांच्या हस्ते




झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. सुजित धर्माधिकारी (संचालक, एमआयटी पुणे) होते. विविध क्षेत्रातील मान्यवर, उद्योजक, शिक्षणतज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते आणि पुरस्कार विजेते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अॅड. प्रा.सदाशिव माळगे यांनी शिक्षण, पत्रकारिता, समाजसेवा आणि युवकांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी सातत्याने केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

> या गौरवाबद्दल अक्कलकोट तालुक्यासह आळगे गावातील ग्रामस्थ, विविध सामाजिक, शैक्षणिक, पत्रकार आणि राजकीय क्षेत्रातील मान्यवरांकडून अॅड. प्रा. सदाशिव माळगे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, सामाजिक प्रबोधन आणि विविध शैक्षणिक उपक्रमांमधील त्यांचे योगदान विशेष उल्लेखनीय मानले जाते.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर अॅड. प्रा. माळगे यांनी हा सन्मान आपल्या कुटुंबीय, गुरुजन, सहकारी आणि समाजातील सर्व हितचिंतकांना समर्पित करत, भविष्यातही समाजहिताची कार्ये अधिक जोमाने सुरू ठेवण्याचा संकल्प व्यक्त केला.

## सभापतीपदी अशोक राक्षे तर उपसभापतीपदी रणजीत गाडे

**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**

राजगुरुनगर येथील कृषी उत्पन्न बाजार समिती खेडच्या सभापतीपदी अशोक बबन राक्षे आणि उपसभापतीपदी रणजीत विठ्ठल गाडे यांची बिनविरोध निवड झाली. शिवसेनेचे (उबाठा) आमदार बाबाजी काळे यांच्या नेतृत्वाखाली ही निवड प्रक्रिया पार पडली. मंगळवारी (दि २८) बाजार समितीच्या येथील सभागृहात अध्यासी अधिकारी, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था सचिन देशमुख यांनी संचालकांची विशेष बैठक बोलावली होती. त्यात निर्धारित वेळेत सभापती पदासाठी अशोक राक्षे आणि उपसभापती पदासाठी रणजित गाडे यांचे एकमेव अर्ज दाखल झाले होते.



> पुणे जिल्ह्यात जनावरांचा बाजार आणि भाजीपाला व्यवसायात अग्रगण्य असलेल्या बाजार समितीच्या सध्याच्या निवड प्रक्रियेत मावळते सभापती अॅड विजयसिंह शिंदे पाटील यांनी राजीनामा दिला. त्यानंतर न्यायालयीन प्रक्रियेत अशोक राक्षे यांचे काही दिवस गेले. मात्र त्यावर मात करीत राक्षे सभापती पदावर विराजमान झाले.

बैठकीस माजी आमदार दिलीप मोहिते पाटील आणि संचालक विनोद टोपे हे अनुपस्थित राहिले. प्रभारी सचिव बाळासाहेब धंद्रे यांनी निवडणुक कामकाजात सहभाग घेतला. अॅड विजयसिंह शिंदे पाटील, मावळत्या उपसभापती क्रांती सोमवंशी, संचालक माणिक गोरे, सुधीर भोमाळे, सागर मु-हे, जयसिंग भोगाडे, सोमनाथ मुंगसे, महेंद्र गोरे, कमल कड, कैलास लिंभोरे, अनुराग जैद, सयाजी मोहिते, हनुमंत कड, विठ्ठल वनघरे हे सभागृहात उपस्थित होते.

आमदार बाबाजी काळे, संत तुकाराम सहकारी साखर कारखान्याच्या संचालिका ज्योती आरगडे, निमगावचे माजी सरपंच अमर शिंदे, राजगुरुनगर सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष किरण आहेर, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य जितेंद्र राक्षे, माजी सभापती सतीश राक्षे, मृगेंद्र काळे, संजय घनवट, सुभाष होले, दत्ता सातपुते , मारुती सातकर, सतीश चांभारे , पोलिस पाटील बाळासाहेब शिंदे, आदींनी नवनिर्वाचीत सभापती, उपसभापती यांचे अभिनंदन केले.

सन २०२३ च्या निवडणुकीत नवनिर्वाचित सभापती अशोक राक्षे आणि उपसभापती रणजीत गाडे हे माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्या पॅनेल मधुन निवडून आले होते.

त्यावेळी एकूण १८ पैकी मोहिते पाटील यांचे ११ संचालक निवडून येऊन बहुमत सिद्ध झाले होते.त्यांचे समर्थक सभापती कैलास लिंभोरे यांनी पदाचा राजीनामा दिला होता आणि त्यानंतर सन २०२४ मध्ये बाजार समितीत सत्तांतर झाले. नवनिर्वाचित सभापती अशोक राक्षे यांच्यासह त्यावेळी तीन संचालक विरोधी गटात सामील झाले होते.

## वॉटरवर्ल्ड इंडियाचा पुण्यात तीन दिवसीय जनजागृती उपक्रम

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जागतिक आरोग्य संघटना यांच्या पुढाकाराने दरवर्षी साजरा करण्यात येणाऱ्या “जागतिक बुडणे प्रतिबंध दिन” निमित्त वॉटरवर्ल्ड इंडियाच्या वतीने पुण्यात तीन दिवसीय “बुडणे प्रतिबंध जनजागृती अभियान” यशस्वीपणे आयोजित करण्यात आले. हा उपक्रम वॉटरवर्ल्ड इंडियाच्या वॉटरवर्ल्ड अॅक्वाटिक क्लब, खराडी, वॉटरवर्ल्ड स्विम स्कूल, वडगाव शेरी आणि वॉटरवर्ल्ड ट्रेनिंग सेंटर, घोरपडी या तीन केंद्रांवर पार पडला. या अभियानामध्ये १५० हून अधिक नागरिक, विद्यार्थी, पालक आणि जलतरणप्रेमींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या उपक्रमाचा मुख्य उद्देश बुडण्याच्या घटनांविषयी जनजागृती



करणे, पाण्याजवळ सुरक्षित वर्तनाची माहिती देणे, पोहण्याचे महत्त्व पटवून देणे तसेच प्रत्येक नागरिकामध्ये जलसुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करणे हा होता. यावेळी वॉटरवर्ल्ड इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी विजय कुमार साह यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, बुडणे ही एक गंभीर परंतु पूर्णपणे टाळता येण्यासारखी दुर्घटना आहे.

## अपोलो हॉस्पिटल्समध्ये रोबोटिक-सहाय्यित हृदय बायपास शस्त्रक्रिया यशस्वी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

अपोलो हॉस्पिटल्स पुणे येथे ‘दा विंची Xi’ रोबोटिक शस्त्रक्रिया प्रणालीच्या साहाय्याने पहिली रोबोटिक-सहाय्यित कोरोनरी आर्टरी बायपास ग्राफ्ट (सीएबीजी) शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आली. पारंपरिक हृदय बायपास शस्त्रक्रियेच्या तुलनेत कमी चिरे आणि शरीरावर कमी आघात करणाऱ्या या आधुनिक पद्धतीमुळे पुणे आणि परिसरातील हृदयरुग्णांसाठी




उपचाराचा नवा पर्याय उपलब्ध झाला आहे. या तंत्रज्ञानाद्वारे पहिली शस्त्रक्रिया ६७ वर्षीय पुरुष रुग्णावर करण्यात आली. संबंधित रुग्णाला हृदयाच्या तीन प्रमुख रक्तवाहिन्यांमध्ये अडथळे असल्याचे निदान झाले होते. शस्त्रक्रियेनंतर रुग्णाची प्रकृती वेगाने सुधारली आणि चौथ्याच दिवशी त्यांना रुग्णालयातून घरी सोडण्यात आले. या पहिल्या यशस्वी शस्त्रक्रियेनंतर अवघ्या एका महिन्यात अशाच आणखी सहा रोबोटिक-सहाय्यित बायपास शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आल्याचे रुग्णालयाने सांगितले.

पारंपरिक बायपास शस्त्रक्रियेमध्ये छातीचे हाड उघडावे लागते. मात्र, रोबोटिक-सहाय्यित पद्धतीमध्ये काही लहान चिरांमधून शस्त्रक्रिया करता येते. ‘दा विंची Xi’ प्रणालीमुळे शल्यचिकित्सकांना उच्च दर्जाचे त्रिमितीय दृश्य आणि उपकरणांवर अत्यंत अचूक नियंत्रण मिळते. त्यामुळे निवडक रुग्णांमध्ये गुंतागुंतीच्या हृदय शस्त्रक्रियाही कमी चिरांमधून करता येतात. ही शस्त्रक्रिया अपोलो हॉस्पिटल्स पुणे येथील रोबोटिक व कमी चिरांच्या हृदय शस्त्रक्रिया विभागाच्या वरिष्ठ सल्लागार डॉ. स्मृती हिंदारिया, हृदय भूलतज्ज्ञ डॉ. बिकाश साहू तसेच हृदयरोग आणि अतिदक्षता विभागाच्या बहुविद्याशाखीय पथकाने केली. डॉ. स्मृती हिंदारिया म्हणाल्या, “रोबोटिक-सहाय्यित बायपास शस्त्रक्रियेमुळे गुंतागुंतीच्या हृदय शस्त्रक्रिया अधिक अचूकतेने करता येतात आणि रुग्णाच्या शरीरावर होणारा परिणामही कमी करता येतो. मात्र, ही पद्धत प्रत्येक रुग्णासाठी योग्य असेलच असे नाही.

## थोडक्यात पण महत्वाचे




### असोसिएशनच्या अध्यक्षपदी ॲड. ज्ञानेश्वर नरवाडे यांची बिनविरोध निवड

पुणे (आरंभ पर्व) : महाराष्ट्र टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशनच्या (एमटीपीए) अध्यक्षपदी ॲड. ज्ञानेश्वर नरवाडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. ४६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत वर्ष २०२६-२७ साठी नवीन कार्यकारिणीची बिनविरोध निवड करण्यात आली. यामध्ये ॲड. नरवाडे यांच्यासह उपाध्यक्षपदी ॲड. प्रणव शेठ, सचिवपदी मिलिंद हेंद्रे, सहसचिवपदी कैलास काशीद आणि खजिनदारपदी सीएमए नवनाथ नलावडे यांची निवड झाली. नवनिर्वाचित अध्यक्ष ॲड. ज्ञानेश्वर नरवाडे यांनी सभासदांचे आभार मानत, संस्थेची उज्ज्वल परंपरा जपत अधिक दर्जेदार, अभ्यासपूर्ण आणि नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याचा संकल्प व्यक्त केला. कर सल्लागारांचे ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी अधिकाधिक स्टडी सर्कल्स, सेमिनार्स आणि प्रशिक्षण कार्यक्रम केवळ पुण्यातच नव्हे तर राज्यातील विविध भागांत आयोजित केले जातील, असे त्यांनी सांगितले. नवीन कार्यकारिणीच्या नेतृत्वाखाली 'एमटीपीए' सभासदांच्या व्यावसायिक प्रगतीसाठी आणि कर क्षेत्रातील बदल प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी अधिक जोमाने कार्य करेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. यावेळी माजी अध्यक्ष ॲड. नरेंद्र सोनावणे, सीएमए श्रीपाद बेदरकर, मनोज चितळीकर, अनुरुद्र चव्हाण, प्रसाद देशपांडे आदी उपस्थित होते. कर सल्लागार संस्था आपल्या कार्यामुळे महाराष्ट्रासह संपूर्ण देशात प्रसिद्ध आहे. दोन हजाराहून अधिक मान्यवर सभासद आहेत. संस्थेकडून सर्व कर सल्लागार, सनदी लेखापाल आदींना कर रचनेतील विविध बदल याबाबत मार्गदर्शन करण्याबरोबरच, प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष करांबाबत सरकारच्या विविध योजनांचा प्रसार केला जातो.

### राजेंद्र कांचन यांच्या वाढदिवसानिमित्त विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रम

- गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार; गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

उरुळी कांचन (आरंभ पर्व) : डॉ. मणिभाई देसाई पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजेंद्र ज्ञानोबा कांचन यांच्या वाढदिवसानिमित्त विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षेत विशेष प्रावीण्य मिळविलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप, वृक्षारोपण तसेच विशेष व्याख्यान गुरुवार, दि. ३० जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आले आहे. यावेळी सुप्रसिद्ध व्याख्याते प्रा. डॉ. विनोद पवार यांचे 'आता थांबायचं नाय' या विषयावर व्याख्यान होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे माजी अध्यक्ष किशोर राजेनिंबाळकर असणार आहेत. कार्यक्रमाला उरुळी कांचन देवस्थान संस्थेचे अध्यक्ष ज्ञानोबा कांचन, पुणे जिल्हा परिषदेचे माजी समाजकल्याण सभापती जितेंद्र बडेकर, पंचायत समितीच्या सदस्या कोमल कांबळे, सरपंच मिलिंद जगताप आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तसेच पतसंस्थेचे सर्व संचालक, मुख्य व्यवस्थापक, शाखाधिकारी, सभासद, ठेवीदार, सल्लागार आणि कर्मचारीवर्ग उपस्थित राहणार असल्याची माहिती डॉ. मणिभाई देसाई पतसंस्थेचे उपाध्यक्ष रामदास चौधरी यांनी दिली. पुणे-सोलापूर रस्त्यावरील कृपा रोझ नर्सरीशेजारी असलेल्या रॉयल बँक्वेट हॉल, उरुळी कांचन येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

## महर्षी कर्वे कुटीसमोरील 'चिंतन अंगण' म्हणजे त्यांच्या विनम्रता व साधेपणाचे प्रतीक

### ऐतिहासिक कुटीला १२६ वर्षे पूर्ण; संस्थेच्या १३०व्या वर्धापनदिनी 'चिंतन अंगण'चे लोकार्पण

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महर्षी कर्वे स्त्रीशिक्षण संस्थेच्या आवारातील भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे अर्थात अण्णांच्या ऐतिहासिक 'कुटी'ला यंदा १२६ वर्षे पूर्ण होत आहेत. या कुटीसमोरील अंगणाला आता सुंदर आणि कलात्मक 'चिंतन अंगण'चे स्वरूप देण्यात आले असून, संस्थेच्या १३०व्या वर्धापनदिनी त्याचे नुकतेच लोकार्पण करण्यात आले. 'चिंतन अंगण'च्या रचनेसाठी भानूबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर फॉर वूमेनच्या (बीएनसीए) आर्किटेक्चरल सल्लागार कक्षाची नियुक्ती करण्यात आली होती. महर्षी कर्वे यांनी आयुष्याच्या अखेरपर्यंत या कुटीत स्त्रीशिक्षणासंदर्भातील विचार आणि चिंतन सुरू ठेवले. त्याच पार्श्वभूमीवर कुटीसमोरील अंगणाला 'चिंतन अंगण' असे नाव देण्यात आले आहे. पुणे




महापालिकेच्या ऐतिहासिक वारसा वास्तूंमध्ये या कुटीचा समावेश आहे. या प्रकल्पात कुटीशेजारील जुन्या झाडांचा सावलीसाठी उपयोग करण्यात आला आहे. ऐतिहासिक वारशाचे स्वरूप जपत आधुनिक गरजांना पूरक साहित्य वापरण्यात आले आहे. कारंजे, बसण्यासाठी पायऱ्या, तुळशी वृंदावन आणि आशास्तंभ अशा चिंतनाला पूरक घटकांचा समावेश करण्यात आला आहे. महर्षी कर्वे आणि बाया कर्वे यांच्या इतिहासाशी संबंधित शिल्पे व माहिती फलकही उभारण्यात आले आहेत. संस्थेचा इतिहास, आत्मा आणि परिसराचे मूळ स्वरूप जपण्याचा प्रयत्न या प्रकल्पातून करण्यात आला आहे. बीएनसीएच्या भूदृश्यकला विभागप्रमुख डॉ. स्वाती सहस्रबुद्धे म्हणाल्या, "महर्षी कर्वे यांनी स्त्रीशिक्षणाची मुहूर्तमेढ 'ज्ञान, बल आणि सेवा' या तीन तत्त्वांवर रोवली. त्याचे प्रतीक म्हणून त्रिकोणी रचनेत तीन आशास्तंभ चिंतन अंगणात साकारण्यात आले आहेत. स्त्रीशिक्षणातील मूल्याधिष्ठितता, विनम्रता, सेवाभाव आणि अभ्यासक वृत्ती या अण्णांच्या व्यक्तिमत्त्वातील वैशिष्ट्यांचे प्रतिबिंब कुटी आणि त्यासमोरील अंगणाच्या रचनेतून उमटते."

चिंतनाचे प्रतीक म्हणून येथे कारंजी साकारण्यात आली आहेत. दीपस्तंभ आणि तुळशी वृंदावन या सांस्कृतिक खुणांचाही अंगणात समावेश असून त्या जांभ्या दगडातून घडविण्यात आल्या आहेत.

## बर्जर पेंट्सची 'रंग बना रहे' नवी मोहीम सुरू

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

बर्जर पेंट्स इंडिया लिमिटेडने 'रंग बना रहे' या संकल्पनेवर आधारित नवीन ब्रँड मोहिमेचा शुभारंभ केला आहे. आयुष्यात कितीही आव्हाने आली तरी व्यक्तिमत्त्वातील रंग आणि उत्साह फिका पडू नये, हा या मोहिमेचा मुख्य संदेश आहे. रंगांच्या टिकाऊपणाबाबत कंपनीच्या दीर्घकालीन भूमिकेला मानवी जीवनातील जिद्द आणि सकारात्मकतेशी जोडण्याचा प्रयत्न या मोहिमेतून करण्यात आला आहे. बर्जर पेंट्सने होमशील्ड, वेदरकोट अँटी डस्ट आणि ईजी क्लीन यांसारख्या उत्पादनांच्या माध्यमातून पाऊस, धूळ आणि दैनंदिन डागांपासून रंगांचे संरक्षण करण्यावर भर दिला आहे. 'रंग बना रहे' या मोहिमेत हीच संकल्पना भिंतींपलीकडे नेत मानवी स्वभावाशी जोडण्यात आली आहे.

## एमएक्स प्लेअर बाय प्राइम व्हिडिओवर 'प्लेग्राऊंड'या गेमिंग रिॲलिटी शोचे नवे पर्व

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

भारतातील आघाडीची मोफत, प्रीमियम आणि जाहिरात-आधारित व्हिडिओ स्ट्रीमिंग सेवा असलेल्या एमएक्स प्लेअर बाय प्राइम व्हिडिओने आज 'प्लेग्राऊंड'च्या पाचव्या पर्वाचा ट्रेलर प्रदर्शित केला. यंदाच्या पर्वात खेळ अधिक मोठा, अधिक रोमांचक आणि अधिक आव्हानात्मक असणार आहे. या लोकप्रिय गेमिंग रिॲलिटी शोमध्ये यावेळी प्रथमच तीन मेंटर्सची संकल्पना सादर करण्यात आली आहे. दोन वेळा विजेतेपद पटकावलेला एल्विश यादव पुन्हा एकदा 'केओ क्रॅकेन्स' संघाचे नेतृत्व करताना दिसणार आहे. तेजस्वी प्रकाश 'रेजिंग सेंटॉर्स' संघाची मेंटर म्हणून पदार्पण करणार असून, आरुष भोला 'पॉवर फिनिक्सेस' संघाची धुरा सांभाळणार आहे. सहा आठवडे चालणाऱ्या या स्पर्धेत तीनही संघांमध्ये चुरशीची लढत होणार असून, अखेरीस एकच मास्टरमाइंड विजेता ठरणार आहे. ट्रेलरची सुरुवात प्रत्येक मेंटर त्यांच्या स्वतःच्या जगात व्यग्र असल्याचे दाखवून होते. मात्र अचानक




त्यांच्या आजूबाजूचे वास्तव बदलते आणि ते या गेमिंग विश्वात मेंटर म्हणून दाखल झाल्याचे त्यांच्या लक्षात येते. त्यानंतर ते एकमेकांसमोर थेट आव्हानासाठी उभे ठाकतात. या स्पर्धेत कोणालाही जुळवून घेण्यासाठी वेळ मिळणार नाही. मेंटर्सना प्रत्येक टप्प्यावर स्वतःला बदलावे, अधिक सक्षम बनवावे आणि वर्चस्व सिद्ध करावे लागणार आहे. कारण या खेळात एका क्षणात सर्व काही बदलू शकते. प्रत्येक स्तर हा अंतिम आव्हानासारखा असणार असून, प्रतिस्पर्ध्याला बाद करणे हेच एकमेव ध्येय असेल. ट्रेलरच्या शेवटी सांगितल्याप्रमाणे, यावेळी घरामध्ये खेळ होणार नाही.

## अनुराधा राजाध्यक्ष यांच्या 'मनाचे श्लोक' जागतिक ऑनलाइन स्पर्धेचे चौथे पर्व

### जगभरातील सर्व वयोगटांसाठी विनामूल्य प्रवेश; दिव्यांग, ऑटिस्टिक, गतिमंद आणि कर्णबधिर स्पर्धकांसाठीही विशेष गट

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

अभिनेत्री आणि लेखिका अनुराधा राजाध्यक्ष यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात येणाऱ्या 'मनाचे श्लोक' या जागतिक ऑनलाइन स्पर्धेचे यंदा चौथे वर्ष आहे. जगभरातील स्पर्धकांसाठी खुल्या असलेल्या या स्पर्धेत सहा वर्षांपुढील कोणत्याही वयोगटातील व्यक्ती सहभागी होऊ शकतात. स्पर्धेसाठी प्रवेश पूर्णपणे विनामूल्य असून, ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत स्पर्धकांना आपले व्हिडिओ पाठविता येणार आहेत.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी स्पर्धकांनी आपले नाव, राहण्याचे गाव, वय आणि मोबाईल क्रमांक ही माहिती ९३२६३८९७५५ या स्पर्धेच्या स्वतंत्र क्रमांकावर व्हॉट्सॲप संदेशाद्वारे पाठवावी. त्यानंतर




संबंधित स्पर्धकाला स्पर्धेची सविस्तर माहिती, नियमावली आणि आवश्यक मार्गदर्शन पाठविण्यात येणार आहे. स्पर्धकाने 'मनाचे श्लोक'मधील कोणताही एक श्लोक निवडून तो म्हणायचा असून, त्या श्लोकाचा आजच्या काळातील जगण्याशी जोडलेला अर्थ व्हिडिओद्वारे सांगायचा आहे. हा व्हिडिओ किमान एक ते कमाल पाच मिनिटांचा असावा. श्लोकाचा अर्थ आणि त्याचा आजच्या जीवनाशी असलेला संदर्भ कशा पद्धतीने मांडावा, यासाठी स्पर्धकांना मार्गदर्शक व्हिडिओ आणि लिंकदेखील पाठविण्यात येणार आहे. तयार केलेला व्हिडिओ ९३२६३८९७५५ या क्रमांकावर ३१ ऑगस्टपर्यंत व्हॉट्सॲपद्वारे पाठवायचा आहे. स्पर्धा विविध वयोगटांत घेतली जाणार असून, प्रत्येक वयोगटातील तीन विजेत्यांना रोख पारितोषिके देण्यात येणार आहेत. तसेच व्हिडिओ पाठविणाऱ्या प्रत्येक स्पर्धकाला डिजिटल प्रमाणपत्र देण्यात येईल. सर्वाधिक लोकप्रिय ठरणाऱ्या व्हिडिओला स्वतंत्र पारितोषिक दिले जाणार असून, सर्वाधिक स्पर्धक सहभागी होणाऱ्या संस्थेलाही विशेष पारितोषिक देण्यात येणार आहे.

या स्पर्धेला वयाची कमाल मर्यादा नाही. मागील वर्षी तब्बल ९३ वर्षांच्या एका ज्येष्ठ नागरिकानेही या स्पर्धेत सहभाग नोंदविला होता. अमेरिका, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, सौदी अरेबियासह भारताच्या कानाकोपऱ्यातून स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता. यंदाही स्पर्धेची प्रवेश प्रक्रिया आणि स्पर्धकांकडून व्हिडिओ स्वीकारण्याचे काम जोमाने सुरू आहे. यंदापासून कर्णबधिर मुले, मुली, महिला आणि पुरुषांनाही या स्पर्धेत सहभागी होता येणार आहे. कर्णबधिर स्पर्धकांनी आपली माहिती पाठविताना त्यांचे कॉक्लियर इम्प्लांट ऑपरेशन झाले आहे किंवा नाही, याची माहितीही नमूद करावी. त्यानुसार त्यांच्यासाठी असलेले स्पर्धेचे नियम पाठविण्यात येतील.

ऑनलाइन स्वरूपामुळे जगाच्या कोणत्याही भागातून या स्पर्धेत सहभागी होता येणार आहे. प्रवेश विनामूल्य असून स्पर्धेतील प्रवेश मर्यादित आहेत. त्यामुळे इच्छुकांनी लवकरात लवकर ९३२६३८९७५५ या क्रमांकावर व्हॉट्सॲपद्वारे संपर्क साधून आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयोजक अनुराधा राजाध्यक्ष यांनी केले आहे.

### दिव्यांग स्पर्धकांनाही समान संधी

स्पर्धेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे विविध प्रकारच्या दिव्यांग व्यक्तींनाही यात सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. ऑटिस्टिक तसेच गतिमंद व्यक्तींसाठी स्वतंत्र गट आणि पारितोषिकांची व्यवस्था करण्यात आली आहे. अशा स्पर्धकांनी ९३२६३८९७५५ या क्रमांकावर नाव, राहण्याचे गाव, वय आणि मोबाईल क्रमांक पाठविताना स्पर्धक ऑटिस्टिक अथवा गतिमंद असल्याचे नमूद करावे. त्यांच्यासाठी स्वतंत्र नियमावली आणि प्रवेश प्रक्रिया पाठविण्यात येईल. या गटातील स्पर्धकांनी 'मनाचे श्लोक'मधील कोणताही एक श्लोक म्हणणे एवढीच अपेक्षा आहे.




दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com
• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.